

# शेतीसाठी संजीवनी देणारे अमृत – जीवामृत

शितल लोंढे
आचार्य पदवी विद्यार्थीनी
विस्तार शिक्षण विभाग
वसंतराव नाईक मराठवाडा कृषी विद्यापीठ, परभणी

रासायनिक खतांच्या वापराने उत्पादनात वाढ होत असली तरी जमिनीचा पोत बिघडतो, असे म्हटले जाते. त्यामुळे सध्या सेंद्रिय शेतीचा बोलबाला वाढला आहे. सेंद्रिय खतांमुळे जमिनीचा पोत सुधारून तिची उत्पादन क्षमता वाढवण्यासाठी आणि टिकवण्यासाठी या खतांचे अनन्यसाधारण महत्त्व आहे. अशी खते विकत घेऊन शेती करणे किफायतशीर ठरवण्याची शक्यता कमीच. म्हणून सेंद्रिय खतांची निर्मिती करून आपल्या शेतांमध्ये वापर वाढवणे लाभदायक ठरते. यासाठी कृषी विभागाकडून जीवामृताची शिफारस केली गेली आहे.

### जीवामृत-

जीवामृत नावाचे विरजण अर्थात सुभाष पाळेकर संशोधित जीवामृत हे देशी गायीचे शेण आणि गोमुत्र यांच्यापासून बनवले जाते. हे खत नसून विरजण आहे. जीवामृत हे किण्वन प्रक्रिया तयार करून, पिकांना मुलद्रव्य उपलब्ध करून देते. तसेच पिकांचे बुरशी किडीपासून संरक्षण करते.

### जीवामृत तयार करण्याची पद्धत-

१. बॅरेलमध्ये २०० लिटर पाणी घेवून त्यामध्ये १० किलो गायीचे शेण मिसळून घ्यावे. यानंतर ५-६ लिटर गायीचे गोमुत्र, २ किलो गुळ, २ किलो हरभरा डाळीचे पीठ व शेतीच्या बांधावरील मुठभर माती इ. एकत्रित व्यवस्थित मिसळून घ्यावे.

२. हे तयार केलेले द्रावण सावलीत ठेवावे. कमीत कमी २ ते ३ दिवस सावलीत ठेवून, सकाळ – संध्याकाळ काठीने ढवळून घ्यावे. २०० लिटर जीवामृत हे एक एकर साठी पुरेसे होते.

### शेतजमिनीला जीवामृताचा डोस-

जीवामृतात जीवाणूंचे प्रमाण साधारण एका पेल्यात एक कोटी एवढ्या प्रमाणात असते. त्यामुळे या जीवामृताचा डोस वनस्पतींना दिल्यास एकदम जादू झाल्यासारखेच परिवर्तन रोपांवर, फळवृक्षांवर होत असते. हे देण्याची पद्धतही सोपीच आहे.

जर पाटाने पाणी देत असाल तर पाटाच्या सुरवातीला धार धरून ओतावे किंवा फळपिकांना देताना साधारण एका झाडास अडीच लिटर एवढे देणे आवश्यक आहे. मोठी झाडे असल्यास पाणी गरम करून पूर्ण थंड झाल्यावर अडीच लिटर जीवामृत मिसळून वापरल्यासही चालते. हे जीवामृत नावाप्रमाणेच शेतीसाठी जीवामृत आहे. सिंचनाच्या माध्यमातून देखील जीवामृताचा वापर महिन्यातून दोन वेळा केला जातो.

### जीवामृताचे फायदे-

- जीवामृताच्या वापराने जमिनीची सुपीकता वाढतेच त्याचबरोबर जमिनीतील उपायकारक जीवाणूंची संख्यापण वाढण्यास मदत होते व सेंद्रिय कर्बाचे प्रमाण वाढविते.
- भाजीपाला, फळझाडांची रोगप्रतिकार शक्ती वाढत असल्याने शेती जोमदार होते. पर्यायाने उत्पादनातही वाढ होत असल्याने जीवामृत हे शेतीसाठी संजीवनी देणारे अमृतच आहे. त्यामुळे याचा वापर जास्तीत जास्त होणे गरजेचे आहे.
- जीवामृत पिकांमध्ये सहनशीलता वाढवते तसेच किडींना व रोगाला पिकांपासून दूर करते.
- उत्तरायणात बनवलेले जीवामृत लाभदायक ठरते तर देताना सकाळच्या सत्रात म्हणजेच दक्षिणायनात दिल्यास उपयुक्त ठरते.

आज कवी श्रेष्ठ संत ज्ञानेश्वर असते तर ते या जीवामृताचे सामर्थ्य बघून म्हणाले असते, "माझिया जीवामृताचिये बोलु कवतिके, सर्व खतांच्या मात्रांशीही पैजा जिंके".

(संपर्क: +९१ ७२१८३८१९४५)